**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.०१**
देवाची शपथ खरे सांगतो

नाव -मुनेश्वर हरिदास वंजारी.

**<u>सरतपास शपथेवर प्रतिवादी तर्फे वकील श्री एन.एस.इंगळे यांच्या मार्फत सुरू.</u>**

**१०.** माझे शपथपत्र नि. क्र.४४ मधील मजकूर खरा व बरोबर आहे त्यावर माझी सही आहे.

मी खालील दस्तऐवज अभिलेखावर दाखल केले आहे.

**i)** मी माझे वडील हरिदास वंजारी यांच्या नावाने ग्रामपंचायत बेला येथे घर क्र.१०९७ चे मकाण होते त्या मकाणाची सन १९९७-९८ ची घरटॅक्स पावती मुळ अभिलेखावर दाखल केली आहे त्यास **नि. क्र.४७** देण्यात आला.

**ii)** त्यानंतर मी सन १९९५-९६ च्या ग्रामपंचायत बेला येथील माझ्या वडीलांच्या नावाने घर नं.१०४७ अन्वये मकाण होते त्या मकाणाची घरटॅक्स भरलेली पावती मुळ मी अभिलेखावर दाखल केली आहे त्यास **नि.क्र.४८** देण्यात आला.

**iii)** त्यानंतर घर न. १०५८ चा टॅक्स भरणा केल्याची पावती मुळ अभिलेखावर दाखल केली आहे त्यास **नि.क्र. ४९** देण्यात आला.

**iv)** त्यानंतर घर क्र. १५१३ माझ्या नावाने असलेली घरटॅक्स पावती मुळ मी अभिलेखावर दाखल केली त्यास **नि. क्र. ५०** देण्यात आला.

**v)** त्यानंतर मी ग्रामसेवकाने दिलेले प्रमाणपत्र मुळ अभिलेखावर दाखल केले त्यास **नि. क्र. ५१** देण्यात आला.

**vi)** त्यानंतर माझे वडील हरिदास वंजारी यांनी माझा मुलगा महेश वंजारी यांच्या हक्कात मौजा किनाळा येथील गट न.२२ मधील शेतीचे बक्षीसपत्र करून दिले होते त्यावर अज्ञान पालनकर्ता म्हणून बक्षीसपत्र लिहून घेणार महेश वंजारी तर्फे माझी सही आहे तसेच लिहून देणार म्हणुन माझ्या वडीलांची सही आहे तसेच साक्षीदार म्हणून अशोक नाकाडे आणि शैलेश शंभरकर यांच्या सह्या आहेत तसेच अर्जनिस म्हणुन सरिनकुमार शंभरकर हे होते त्यास **आर्टीकल अ** देण्यात आला.

**सरतपास पुर्ण.**

**प्रतिवादीच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात आला.**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड
दि१५.१२.२०२५

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड